धक्का!! सुराज्य

बुधवार, दि. ८ मे २०२४ । पान १२

# महूदला दोन गटात तुंबळ हाणामारी माढा लोकसभेची निवडणूक रक्तरंजित

✔ सांगोला/प्रतिनिधी


तालुक्यातील महूद इथं माढा लोकसभेच्या निवडणुकीतील शांततेत चाललेल्या मतदान प्रक्रियेला गालबोट लागलं. निवडणूक रक्तरंजित झाली. एकनाथ शिंदे शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. दोन्ही गटाचे पाच ते सहा जण गंभीर जखमी झाली आहेत. मतदारांना मतदान केंद्रापर्यंत सोडण्याच्या कारणावरून दोन्ही गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. या घटनेने इथल्या मतदान केंद्रावर बराच वेळ वातावरण तंग बनलं होतं. शेतकरी कामगार पक्षातील देशमुख गटाचे कार्यकर्ते व शिवसेना आमदार शहाजी पाटील यांच्या कार्यकर्त्यात वाद झाला. हाणामारीत कार्यकर्ते जखमी झाले.



माढा लोकसभा मतदारसंघातून महायुतीकडून रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे निवडणूक लढवत असून त्यांची निवडणूक महाविकास आघाडीच धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सोबत होत आहे. या लढतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आज मंगळवारी मतदानावेळी कार्यकर्त्यांत राडा झाला. दोन्ही गट दगड आणि काठ्यांनी एकमेकांवर तुटून पडले. यामध्ये दोन्ही गटाचे कार्यकर्ते रक्तबंबाळ झाले. बोगस मतदान करणाऱ्या व्यक्तीला रोखल्याच्या कारणावरून शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. ही मारहाण करूनही पोलीस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याचे पुढे आले. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्यास बुधवारी सांगोला बंद करू, असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिला आहे. मारहाणीच्या घटनेत शेतकरी कामगार पक्षाचे शंकर पाटील हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## विश्रांती नाहीच; उद्यापासून पुन्हा कुरुक्षेत्रावर

## कार्यकर्त्यांची भेटी अन् विकास कामांचा पाठपुरावा



सोलापूर : रोजचीच ती धावपळ अन् पळापळ...ना वेळेवर झोप...ना जेवण...विश्रांती हा तर विषयच जणू विसरला गेलेला ...पायाला भिंगरी लावल्यागत फक्त पळणं...पळणं ...अन् पळणंच...जिथं कुठं काय खायला मिळेल ते पोटात घालायचं अन् पुढं निघायचं...रात्रीची पूर्णवेळ झोप हा तर विषयंच सपंलेला...ना घर ना दार ...ना कुटूंब भेट...सगळंच काही थांबलेलं....लोकसभा निवडणूक 'हाच श्वास अन् ध्यास' बनून गेलेला...मागचे कित्येक दिवस जगणंच बदलून गेलेलं...याच टप्प्यावर माढा लोकसभा निवडणुकीचं महायुद्ध जणू संपलं...सुटकेचा नि:श्वास सोडला..

दरम्यान, मग आता पुढचं काय? परदेशवारी की अन्य काय? असा प्रश्न जेव्हा माढा लोकसभेचे भाजपचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना विचारला तेव्हा त्यांच्याकडून मिळालेलं उत्तर हे सर्वसामान्यपणे व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा अगदी वेगळं होतं.

नाईक-निंबाळकर म्हणाले, जनसामान्यांच्या सेवेचं कंकण हाती बांधलेला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या झपाटून काम करण्याचा मी फॅन आहे. त्यामुळं निवडणुकीमध्ये दमछाक झाली असली तरी मी थकणारा, दमदणारा आणि सर्वात महत्वाचं म्हणजं ज्या सर्वांनी लोकसभेच्या या निवडणुकीसाठी रात्रीचा दिवस अन् दिवसाची रात्र करुन अपार कष्ट उपसले, त्यांना न भेटता, त्यांना श्रमपरिहार म्हणून घास न भरवता मी परदेशात सहलीवर जाणारा अप्पलपोटी मी नाही.

आज बुधवारपासून कार्यकर्त्यांसोबतच मी असणार आहे. माढा लोकसभेमध्ये समाविष्ट असलेल्या फलटण, माण-खटाव, सांगोला, माळशिरस, माढा आणि करमाळा या मतदार संघातील नेते, पुढारी, कार्यकर्ते यांच्या गाठीभेटी मी घेणार आहे. त्यांच्याशी निवडणुकीमधील हितगुज साधणार आहे, त्यांच्यासोबत श्रमपरिहार करणार आहे, असे उमेदवार नाईक-निंबाळकर सांगत होते.

तसंच माढा लोकसभेच्या मतदार संघात जी विकास कामे मी मंजूर करुन आणली आहेत, त्यामधील काही कामे टेंडरच्या प्रक्रियेत आहेत, काही कामे सुरु आहेत, काही कामे सुरु करायची आहेत,यासंदर्भात पाठपुरावा मला करायचा आहे. मला थांबायचं नाही. मला पळायचंय. मला विकास साधायचा आहे. माढा मतदार संघातील जनतेनं विकास कामांची जी पोच पावती दिली आहे, ती 'ऊर्जा' म्हणून पुन्हा या मतदार संघातील जनतेसाठी अखंडपणे काही ना काही करत राहायचं आहे, असे खासदार नाईक-निंबाळकर मोठ्या आत्मविश्वासानं सांगत होते.


### मोदी, फडणवीस हे कामाचे गुरु

जन्मदाती आई देवाघरी गेल्यानंतरसुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी दु:खाला कवटाळून बसले नाहीत. दु:ख मनात ठेऊन ते पुढच्या काही तासात देशसेवेत आले.हा त्यांचा मोठा आदर्श माझ्यापुढे आहे. मातोश्रींच निधन झाल्यानंतरसुद्धा आपली जबाबदारी म्हणून ते देशसेवेत येतात मग मी तर निवडणूक झाल्यानंतर लगेच जनसेवेच्या कामाला लागायला हवं ना? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचंदेखील तसंच आहे. महाराष्ट्रातील जनतेसाठी ते आपला किती तास वेळ देतात त्याप्रमाणं मी कामाला लागायला हवं असे खासदार नाईक-निंबाळकर म्हणाले. मोदी आणि फडणवीस हे माझे आयडॉल आहेत, असेही त्यांनी सांगितलं.

### उमेदवार अन् निवडणुकीनंतरचं व्हिजन

## निवडणूक लोकसभेचीच पण कुरुक्षेत्र वेगळे

## जबाबदारीसुद्धा वेगळीच, मात्र करुन दाखविणार!



सोलापूर : सोलापूर लोकसभेच्या कुरुक्षेत्रावर लागलेल्या महायुद्धात उमदेवार म्हणून मागील अनेक दिवस कार्यरत होतो. पण दमलो नाही की थकलो नाही. काम करणं हे माझ्या रक्तातच आहे. सोलापूर लोकसभेची निवडणूक संपल्यानं परवा गुरुवार (ता.९) पासून उत्तर मुंबई लोकसभेच्या मतदार संघाच्या कुरुक्षेत्रात जातोय, निरीक्षक म्हणून दिलेली जबाबदारीचं मैदान मारुन येतोय, असं सोलापूर लोकसभेचे भाजपाचे उमेदवार आमदार राम सातपुते मोठ्या विश्वासानं सांगत होते.

लोकसभेची निवडणूक पार पडल्यानंतर आता पुढं काय? निवडणुकीचा शिणवटा घालविण्यासाठी कुंटूंबासमवेत परदेशवारी किंवा अन्यत्र कोठे सहल असं काय नियोजन ठरलंय का? असं उमेदवार सातपुते यांना विचारलं तेव्हा ते म्हणाले तसं नाही. उत्तर मुंबई लोकसभेच्या मतदार संघात निरीक्षक म्हणून माझी नियुक्ती पक्षानं मोठ्या विश्वासानं केली आहे, या पदाचं काम तिथं जाऊन अत्यंत प्रामाणिकपणे, सचोटीनं प्रभावशालीरित्या करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

'कामच आपला गुरु' हे समीकरण आपण मानतो, दिलेलं उत्तरदायित्व, जीव लावून केलेलं काम हेच आपणास पुढं नेतं. त्याप्रमाणं मी कामालाच गुरु मानलं आहे. त्यामुळं की मी सदैव कार्यरत राहतो. कामाशिवाय मला चैन पडत नाही, असं सातपुते यांनी सांगताच सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीचं कामं संपताच मी विश्रांती न घेता पुढच्या कामाच्या मोहीमेवर निघालो आहे, असे सांगत सातपुते म्हणाले की, उत्तर मुंबई लोकसभेच्या निवडणुकीत निरीक्षक म्हणून चांगले काम करत पक्षाला योगदान देण्याबरोबरच या कामातून एक वेगळा आंनद मिळवणार आहे, असेही त्यांनी सांगितलं.

### वडिलांना घडविणार देवदर्शन

उत्तर पूर्व मुंबई लोकसभेच्या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून येत्या २० तारखेपर्यंत मी तिकडं असणार आहे. त्यानंतर वडिल आणि सौभाग्यवती यांना घेऊन देवदर्शनासाठी जाण्याचं नियोजन आहे. जन्मदात्या वडिलांना देवदर्शन घडविण्यात मला मनस्वी आनंद आणि समाधान वाटते, असेही आमदार राम सातपुते म्हणाले.

### माळशिरस मेरी जान

सोलापूर लोकसभेचा खासदार होण्यासाठी मी लढलो असलो तरी माळशिरस तालुक्याला मी कदापि विसरणार नाही. या तालुक्याशी जुळलेलं माझं नातं हे माया, ममता, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि वात्सल्याचं आहे. उत्तर पूर्व मुंबई लोकसभेच्या निवडणुकीच्या जबाबदारीमधून मुक्त झाल्यानंतर मी लगेच माळशिरस गाठणार आहे. या तालुक्यातील अनेकांना मी भेटणार आहे. त्यांच्याशी मनमोकळणेपणानं चर्चा करणार आहे. त्यांना भेटण्यात, त्यांना बोलण्यात मला खूप आनंद आणि वेगळी ऊर्जा मिळत राहते.

## नेत्यांचा विश्वास अन् मतदारांच्या प्रेमामुळे माझा विजय निश्चित

### मतदानानंतर राम सातपुते यांचा विश्वास

सोलापूर : सोलापूर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचा विजय निश्चित आहे. भाजपचे नेते यांनी आपल्यावर दाखविलेला विश्वास मतदारांनी दाखविलेले प्रेम ही आपल्या विजया मागील गणिते आहेत. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याचे आमदार सातपुते यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

निवडणूक निकाल जाहीर होण्याअगोदरच काँग्रेसने साजरा केलेला लूटूपूटूचा उत्सव हा तकलादू ठरणार आहे. यापूर्वी काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे, उज्वला शिंदे यांच्या पराभवापूर्वी साजरा करण्यात आलेला उत्सव घडीचा ठरला होता. त्याचप्रमाणे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मतदान संपल्यानंतर मंगळवारी काँग्रेसने हूसणे अवसान आणून काढलेली मिरवणूक ही आमदार प्रणिती शिंदे यांच्या पराभवावर विरजण टाकणारी आहे. असे अशी टीका भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राम सातपुते यांनी केली. लोकसभा मतदारसंघातील मतदान संपल्यानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार यांच्यासह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते. आपल्यावर विश्वास दाखवून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. आपल्या विजयासाठी मतदार संघातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. मतदारांनी त्यास प्रतिसाद देत भारतीय जनता पक्षाला मोठ्या प्रमाणात मतदान केले. त्यामुळे विजय निश्चित असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

## जनता माझ्या पाठीशी, विजय होणारच : आ. शिंदे

### जागृती प्रशालेत शिंदे कुटुंबियांचे मतदान

सोलापूर : सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी आपले वडील सुशीलकुमार शिंदे आई उज्वला शिंदे यांच्यासह जागृती प्रशालेत मतदानाचा हक्क बजावला. काँग्रेसच्या प्रणिती शिंदे मतदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना म्हणाल्या, आमच्याही संपवण्यासाठी लढवत आहे. मला शेतकऱ्यांच्या मालाला चांगला हमीभाव द्यायचा आहे , सोलापूर दुष्काळमुक्त, सोलापूर खड्डे मुक्त, युवकांच्या हाताला रोजगार, विमानसेवा सुरू करायची आहे. त्यासाठी माझा प्रयत्न असून निश्चितच सोलापूरचे जनता माझ्या पाठीशी राहील.

### भाजप दोनशे पार होणार नाही : सुशीलकुमार

सुशीलकुमार शिंदे म्हणाले, ही लढाई संविधान वाचवण्याचे आहे आणि यासाठी आम्ही मरेपर्यंत प्रयत्न करू, ४०० चा नारा दिला जातो मात्र दोनशे ही पार होणार नाहीत, त्यामुळे त्या चार जून रोजी पहा काय होते ते.

### निकालापूर्वीच काँग्रेसची रॅली

मतदानानंतर सायंकाळच्या सुमारास काँग्रेसने विजयी रॅली काढली. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत प्रणिती शिंदे यांच्या विजयाच्या घोषणा केल्या. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक विनोद भोसले आणि पदाधिकारी उपस्थित होते. निकालाच्या आधीच काँग्रेसने काढलेली विजयाची रॅली चर्चेचा विषय ठरली.

### विजय मिळण्यात शंका नाही : नरोटे

देशातील जनता मोदी यांच्या कामाला कंटाळली आहे. सोलापुरात द्वेषाचे राजकारण जाणीवपूर्वक करण्यात आले. हे जनता जाणून आहे. लोकांनी आ. शिंदे यांनी त्यांच्या १५ वर्षाच्या काळात केलेल्या विकास कामाला साथ दिली आहे. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे, त्यामुळेच आम्ही रॅली काढल्याचे चेतन नरोटे म्हणाले.

### जनता पुन्हा मोदी यांच्याच मागे: काळे

काँग्रेसने काढलेली रॅली म्हणजे हास्यास्पद आहे. ही रॅली फक्त प्रभाग १५ पुरती मर्यादित आहे. त्या प्रभागाच्या बाहेर काँग्रेस आहेच कुठे असा सवाल करत भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी भाजपचे आ. राम सातपुते विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला. जनता पुन्हा एकदा मोदी यांच्या मागेच उभे राहील, असेही ते म्हणाले.

## रसायन टाकून मतदान यंत्र जाळण्याचा प्रयत्न

### बागलवाडीत मतदान केंद्रावर गोंधळ, सर्तकतेमुळे अनर्थ टळला

✔ सांगोला/प्रतिनिधी

माढा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, सांगोला तालुक्यातील बागलवाडीत आज मतदान प्रक्रियेदरम्यान दादासाहेब मनोहर तळेकर यानं रसायन टाकून ईव्हीएम मशिन जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांच्या सर्तकतेमुळं पुढचा अनर्थ टळला. या घटनेमुळे इथल्या मतदान केंद्रावर गोंधळ निर्माण झाला होता.

दरम्यान, याप्रकरणी तळेकर या युवकास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला मात्र तो धक्काबुकी करुन पळून गेला होता. मतदान केंद्राध्यक्ष अकुंश चव्हाण यांनी



याप्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यानुसार तळेकर याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

मतदान यंत्र जाळण्याचा प्रकार घडेपर्यंत त्या मशिनवर ४१० मतदान झाले होते. पण कर्मचाऱ्यांच्या दक्षतेमुळे ते मशिन सुस्थितीत आहेत. व्हीव्हीपॅटच्या स्लिपाही व्यवस्थित आहेत. मशीन सुस्थितीत आहे. मात्र, कोणताही धोका नको; म्हणून त्या केंद्रावर नवीन ईव्हीएम मशीन बसविण्यात आले आहे. त्या मशीनवर पुढील मतदान सुरळीतपणे सुरू आहे.

सांगोला तालुक्याच्या दुष्काळी पश्चिम भागातील बागलवाडी येथे दादासाहेब मनोहर चळेकर या तरुणाने ज्वलनशील पदार्थ टाकून ईव्हीएम मशिन जाळण्याचा प्रयत्न केला. मात्र, उपस्थित अधिकाऱ्यांनी तातडीने मशिनवर पाणी ओतून आग आटोक्यात आणली, त्यामुळे मशिन नुकसान टळले आहे. चळेकर हा अंतरावली सराटीतील लाठीहल्याचा प्रकार, तसेच पाणी आणि चार टंचाईचा वारंवार उल्लेख करत आहे, त्यामुळे त्याने हे कृत का केले, हे निष्पन्न होऊ शकले नाही.

### पोलिसांकडून चळेकरची चौकशी

दादासाहेब मनोहर चळेकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडे मशिन पेटविण्याबाबत चौकशी केली असता तो अंतरवाली सराटीतील लाठीहल्याची घटना, पाणी आणि चारा टंचाई अशी वेगवेगळी कारणे देत आहे. तो थोडी बडबड करत आहे, त्यामुळे त्याने काही उत्तेजक द्रव्य घेतले आहे का, याचीही तपासणी पोलिसांकडून केली जात आहे. या प्रकरणी पोलिस चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया राबविणार आहेत.

## रणरागिणींमध्ये मतदानाचा उत्साह कमीच

### सोलापुरात साडेपाच तर माढ्याला सात टक्के मतदान कमी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीसाठी मंगळवारी (दि.७) सोलापूर व माढा मतदारसंघात मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदारांमध्ये लोकशाहीच्या या पंचवार्षिक महोत्सवात सहभागी होण्याबाबत उत्साह होता. मात्र पुरुषांपेक्षा महिलांनी मतदानात कमी उत्साह दाखविला.

सोलापूर मतदारसंघात ५७.४६ टक्के मतदान झाले. झालेल्या मतदानात ६,२५,६९९ पुरुषांनी मतदान केले. तर ५,४०,८५७ महिलांनी मतदान केले. एकुण ६०.०८ टक्के पुरुषांनी तर ५४.७२ टक्के महिलांनी मतदान केले. पुरुषांपेक्षा ८४,८४२ महिलांनी कमी मतदान केले.

हे प्रमाण पुरुषांपेक्षा साडे पाच टक्के कमी आहे. दुसरीकडे माढा मतदारसंघात एकुण ५९.८७ टक्के मतदान झाले. त्यामध्ये ६,५२,६१७ पुरुष तर ५,३९,५४८ महिला मतदारांनी मतदान केले.

माढ्यातही पुरुषांपेक्षा १,१३,०६९ कमी महिलांनी मतदान केले. टक्केवारीच्या प्रमाणात हे प्रमाण पुरुषांपेक्षा जवळपास ७ टक्के कमी आहे.

यंदा सर्वच पक्षांनी महिला मतदारांना खूष करण्यासाठी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. मात्र असे असले तरी महिला अजूनही राजकारणात दखलअंदाजी करण्यात पुरुषांपेक्षा कमीच पडत आहेत, असे म्हणण्यासारखी ही परिस्थिती आहे.

### दुपारी तीननंतर तुलनेत माढ्यात वेगाने मतदान

विशेष म्हणजे दुपारी ३ वाजेपर्यंत माढा मतदारसंघात ३९.२६ टक्के तर सोलापूर मतदारसंघात ४०.१८ टक्के मतदान झाले होते. मात्र मतदान संपल्यानंतर सोलापुरात ५७.४६ टक्के तर माढ्यात ५९.८७ टक्के मतदान झाल्याचे दिसून आले. म्हणजे शेवटच्या तीन तासात माढ्यात मतदनाचा वेग सोलापूरपेक्षा जास्त वाढला. परिणामी सोलापूरला मागे टाकत माढ्याने सोलापूरपेक्षा अडीच टक्के अधिक मतदान नोंदविले.

